म. [illegible] ठाणें.
विषय काव्य
वा. नं. ९३६

…त पुस्तकमाला नंबर ३.

…यांनी आणि नीतिपर

# …करितां गाणीं.

…गी नांवें बहु द…ता धर्मनियां संसारिहो सर्वदा
…जी सती पतिलाहि मानि वडिलां केंव्हां धरीना मदा
…जी पाळी व्रत आपुलें विमल कीं निर्दोष सन्मान्य हो
…ती स्त्री धन्य जगांत जन्मुनि असे बाकी वृथा भार हो

हें म्हणतें पुस्तक छापणार…
…छापी ठाणें येथें 'श्रीगण…
छापखान्यांत…

आवृत्ति १

न ३९९
म. ग्रं. सं. ठाणें
विषय
काव्य
संग्रहालय क्रमांक
लेखक
सन
१८८९
पुस्तकाचें नांव. स्त्रियांकरितां गाणी

पृथ्वीवृत्त.

जपे बहुत जो मला सदयही कृतीनें भला ॥
सुमान्यहि मनें खरा श्वशुर जो मला लाभला ॥
जरी सुगुणि तत्सुता-विरह-दुःखि मी जाहलों ॥
निराश्रित बघूनि त्या सुखि करावया लाजलों ॥

पुस्तक
तीर्थस्वरूप राजमान्य राजश्री
सदाशीव नारायण जोशी राहणार
पनवेल यांस नम्रतापूर्वक
अति आदरानें
अर्पण केलें
आहे.

कृ० ग० अ०

ठाणे

# प्रस्तावना.

जरी अलीकडे मराठी भाषेंत अनेक विषयांवर उपयुक्त व नीतीपर पुस्तकें झालीं आहेत तरी साधारणतः स्त्रियांचा काळ संसारकृत्यांत जात असल्यामुळें त्यांपासून त्यांस तादृश उपयोग होण्याचा संभव फार कमी असतो. सवडीप्रमाणें प्रसंगाविशेषीं गाणीं ह्मणून करमणुक करणें ही पद्धत पूर्वापार सर्वत्र चालू आहे. त्या पद्धतीकडे लक्ष देऊन व्यवहारांत ज्या बऱ्या वाईट गोष्टी स्त्रियांस कळणें अवश्य असतें त्यासंबंधानें उपदेशपर गाणीं मुद्दाम तयार केलीं आहेत. यांत पुराणांतील कांहीं मनोरंजक आणि नीतीपर कथानकांचाही गाण्यांच्या रूपानें समावेश केला आहे. हीं ह्मटल्यापासून किंवा ऐकिल्यापासून स्त्रियांस आपलें कर्तव्य काय हें सहज कळण्यासारखें आहे; व त्यांचें मनन करून तदनुसार वर्तन केल्यास पुष्कळ हित होईल अशी खात्री आहे. यांतील चाली साध्या व परिपाठांतील असून कानास गोड लागणाऱ्या आहेत. एकंदरींत हीं गाणीं स्त्रियांस उपयुक्त होतील असा यत्न केला आहे. नीरक्षीर न्यायानें वाचकांनीं त्यांचा स्वीकार केल्यास फार आभार वाटतील.

ल० ग० भ०

ग्रंथसंग्रहालय ... क्रमांक १२५ ... मराठी ...

# स्त्रियांकरितां गाणीं.

## गाणें १ लें.

मत्प्रभु सौभाग्यातें देती अलंकार जोडुनी ॥
श्रीहरि राखी सद्गुण ऐसे थोर कृपाकरुनी ॥ अ. क. ॥
सद्बोधाचें केतक नीती नाग पुढें लावुनी ॥
उपदेशानें वेणि गुंफिली ज्ञान मूद घालुनी ॥
ममता सोज्वळ टिळा भाळिं तो भक्तीचें गोंदणें ॥
समाधान नथ नाकिं शोभते प्रेमटीक कोंदणें ॥
ऐक्याची ती माळ घातिली गळां हेतु धरुनी ॥
निष्ठेचें तें पदक ओंविलें तिजमधिं रोखोनी ॥ अ. क. ॥
विद्या गळसरि ठुशि निस्पृहता कीर्ति सरी घातली ॥
आरोग्याची दूब गांठुनी वरती हो बांधिली ॥
चंद्रहार हा दया क्षमेचा आवडि फासा तया ॥
तनुवरि राही सुखकर होई नाहीं उपमा जया ॥
चातुर्याची बुगडि घडविली बुद्धिकळा लावुनी ॥
अद्वैताचीं कुडीं बनविलीं थोरपणें सांधुनी ॥ अ. क. ॥
अनुभव वांकी सुकृत बांगड्या उमोप या हातीं ॥
शांति पाटल्या गोठ धिराचे अधार बहु होती ॥
कंबरपट्टा गुप्त तपाचा फांसा सत्याचा ॥
कुलीनतेचा शालु दीधला रंगचि सत्वाचा ॥
सुशील तोडे पायिं घातिले निरभिमान जोडवी ॥
सत्कीर्तन हें गेंद चढविले मानस जें तोषवी ॥ अ. क. ॥

# बारा महिने गाणें २ रें.

चाल—लक्षुमि गर्वें निंदा बोलुनि झिडकारिति

पुजुनि घुडीला करा पाडवा श्रीरामातें स्मरा ॥
चैत्रमासीं रघुविर नवमी उत्साहानें करा ॥ अक ॥
दोलोत्सव हनुमानजयंती येतीं गुणगंभिरा ॥
मंगळ हळदीकुंकु करुनी महिना हो साजरा ॥
वैशाखीं नरसिंह जयंती देशीं सण जो भला ॥
अक्षत्रितिया त्यांतचि येई बहुविध दानाला ॥
दशहर उजडे सुज्येष्ठ मासीं वेद घोष चालला ॥
वटसावित्रीव्रत नेमानें मास बह् साजला ॥ १ ॥अक ॥
अखंड सौभाग्याचें साधन व्रत भक्तीनें धरा ॥
सार्थक करुनी स्त्रीजन्माचें जोडा मंगल वरा ॥
चातुर्मासहि सुरू होतसे अषाढमासीं खरा ॥
एकादशिचें महापुण्य तो देइ उपोषित नरा ॥
जन्माष्टमि ती श्रावणमासीं नऊ दिवस गाजते ॥
राखडिबंधन वाणी करिती पौर्णिमेस हो ते ॥
मंगळवारीं गौरीपूजन मुलींस तुष्टवितें ॥
पूजन देवीचें त्या करिती पुण्य किती वाढतें ॥ २ ॥ अक ॥
गणपतिहरतालिकापूजना भाद्रपदहि येतसे ॥
लीन थोर जन नरनारी यां आनंदा देतसे ॥
ऋषिपंचमीचें व्रतहि आणखि वामनद्वादशी वरी ॥
व्रतस्थ जन जे उद्धाराया येती कितिकापरी ॥
आश्विनमासीं नवरात्रींचा बहुजन उत्सव करी ॥
महालक्ष्मी पूजुनि स्त्रीगण फुंकितसे घागरी ॥३॥ अक ॥
विजयादशमी मुहूर्त दसरा सोडेतिहिंत किं पहा ॥
परोपरी जन पक्वान्नांनीं भोजन करिती महा ॥

...संग्रह...

कार्तिक महिना थोर अनंदें दिपवाळी गाजवी ॥
लोकें ऐशी भाउबीजही ओवाळणि करवी ॥
मार्गशीर्षिं ती दत्तजयंती बहु जन उत्सव करी ॥
निष्ठा ठेउनि दत्ताठाईं तल्लिन हो अंतरीं ॥ ४ ॥ अक ॥
पौषमासिंही सक्रांतीस्तव गोंधळ हलव्याचा ॥
हौशी अबला घरोघरिं तरि घालिति नित्याचा ॥
सात्विक नारी पुण्यशील ज्या अवा लुटविती घरीं ॥
हळदी कुंकू कोणि वाटिती वाणें कितिकापरी ॥
शिवरात्रीचा उपास उत्सव माघामधिं येतसे ॥
लग्नें मुंजी होउनि आणखि सुवाद्य वाजतसे ॥ ५ ॥ अक॥
फाल्गुनमासीं सण पुरुषांचा गजर होळीचा
रंगपचमी दंग करिते सुदीन सर्वांचा ॥
द्वादशमासांचें हें गाणें रमवो सकलांना ॥
सुखकर होवो ईश प्रसादें अपणां सर्वांना ॥ ६ ॥ अक ॥

## श्रीरामायण गाणें ३ रें.

चाल—सौमित्राच्या शरें इंद्रजित निकुंभळीं पडला

रविकुळिं कौसल्येच्या उदरीं राम प्रगट झाला ॥
दशमुखि रावण वधावयासी मनुष्यपण सजला ॥ अक ॥
विश्वामित्रें रामा नेलें जनकनृपापासुनी ॥
हवनरक्षणा ऋषिवर्यांचे राक्षस मर्दूनी ॥
प्रसंग आणुनि सीता माया देवविली रामा ॥
निश्चित केलें विधिनें जैसें देवांचे कामा ॥
चाल—परि कारणभूतचि असती सकलहि जाण ॥
श्रीराम अनादी बालक हें गुज मान ॥
हरिशक्तिगुणासी नमिळे कोणि समान ॥

चाल प०—कपिगणठायीं अंश ठेउनी युद्धातें सजला ॥
वाल्मिकि ऋषिचें भविष्य मानुनि तैसें आचरला॥ १ ॥अक॥
प्रथमारंभीं अरण्यवासा प्रयाण करि तो हरी ॥
सीता लक्ष्मण सवें घेउनी चाले असुरारी ॥
राज्यपदातें भरत योजिती वशिष्ठ ते अवसरीं ॥
पितृभक्त तो राम प्रतिज्ञा करि ताताची खरी ॥
चाल—तो भक्त भरत मानि न राज्य तरी ॥
श्रीराम कृपेहुनि कांहिं नसे त्या सरी ॥
तें रामपदासी अर्पुनि भक्ति करी ॥
चाल प०—राज्य चाललें रामकृपेनें जन बहु सुखि जहाला ॥
पुत्रशोक परि जनक पावुनी वैकुंठीं गेला ॥ २ ॥ अक ॥
सीताचौर्या रामें जाणुनि सीतेसी बोलले ॥
गुप्त रहावें मायासीता स्थापुनि ते गेले ॥
सुवर्णमृग तो वनीं धरूनी हौस पुरवुं लागले
दशमुख कपटी येउनि भिक्षे सीते तैं नेलें ॥
चाल—मग रावण जाउनि शीघ्रचि लंके प्रती ॥
त्या अशोकवनिके ठेउनिया ती सती ॥
विरोध भक्ति करितो मानसिं रामाप्रती ॥
चा०प०—सीते चुकुनि राम बहुत कीं शोक करूं लागला ॥
मनुष्यपण तें खरें घेउनी दुःखींहो पडला ॥ ३ अक ॥
सीताशुद्धिस्तव तैं कपिनां दुरि बहु पाठविलें ॥
मारुति बळभीमानें कार्या थोर सिद्ध केलें ॥
कपिसेना ती सजवुनि सगळी तुमुल युद्ध मांडिलें
कुंभकर्ण आणि इंद्रजिताला गतप्राण केलें ॥
चाल—तो रावण युद्धीं दमला ह्मणीं ॥
तत् शक्ति शोशिली रामें क्षणीं ॥
मग पाहुनि दशमुख समरांगणीं ॥

चा०प०मुखें उडवुनी शरिरापासुनि राम विजयि जाहला ॥
रावणविरोधिभक्ति जाणुनि संतोषा पावला ॥ ४ ॥ अक ॥
रावणवध ऐकुनी बिभीषण दुःखि वहुत जाहला ॥
दशमुखकुलवधुगण तैसाचि शोक करूं लागला ॥
रामें उपदेशुनि त्या राज्यि बिभीषण स्थापियला ॥
पुष्पवृष्टिनें देवगणाला बंदिमुक्त केला ॥
चाल—मग राम परतला अपुल्या स्थानाप्रती ॥
लक्ष्मण सीता कपिही अनुसरती ॥
भरतभेटिची इच्छा मनिं धरिती ॥
चाल प०—भेट होउनी कपी तोषुनी राज्यारुढ झाला ॥
राम राम जन वदत सुखानें मुक्त सदा झाला ॥ ५ ॥ भक ॥

## अभिमन्यु. गाणें ४ थें.

चाल—लक्षुमि गर्वे निंदा०

चक्रव्युह त्या द्रोणें रचितां धर्म काळजी घोर करी ॥
वदे सुभद्रासुत व्युह भेदिन आज्ञा दिधली मला जरी
रूपा तुळितां कमिही मन्मथ कृष्णापरि तो तेज धरी
व्यूह भेदण्या धर्माज्ञेनें चढला धैर्यें रथावरी ॥
मारित कुंजर महावीर करि प्रवेश व्यूहामाझारीं
असंख्य वीर आणि राजपुत्रही तोडित जाई दोहिं करीं ॥
शूरवीर तो कर्ण तयाचे छेदुन टाकी कर्ण परी
अश्वत्थामा कृपाचार्यही वीर्यहीन हो कितीतरी ॥
अभिमन्यूचें शौर्य पाहुनी माना द्रोणचि डोलवीती
व्यूह भेदिला पार्थसुतानें सर्वचि आश्चर्या करिती॥अक॥ १ ॥
व्यूहीं शिरला परि मग गुतला बाणवृष्टिनें घाबरला
स्मरे अर्जुना वीरमणीला यावें सत्वरि साह्याला ॥
कर्ण कडाडे बाण सोडि तो निर्वाणाचे बाणाला

हातींचें तें धनु तोडुनि सुबाणभाता छेदीला ॥
सारथि घोडे द्रोण मारि तैं बाळ घेतसे खड्गाला
रथाखालें मग उतरुनि घेई खड्गें कितीक प्राणांला ॥
दुर्योधन मग खड्ग तोडि तो गदा घेउनी धावियला
अनेकवीरां पाडित जाई हहा:कार तैं रणिं झाला ॥
गदा छेदितां चक्र रथाचें घेई अपुल्या वीर हतीं ॥व्यू० भे०॥२
गदायुद्ध मग दौशासनिशीं चालविलें मग शूरपणें
दोघे मूर्छित होती आपुल्या शूर शत्रुच्या घावानें ॥
दौशासनि परि सावध होउनि गेला बहुतचि वेगानें
शिर भंगिलें अभिमन्यूचें सावध नसतां घायानें ॥
अकाशवाणी झाली कीं हो युद्ध न केलें धर्मानें.
तरी जयद्रथ धावुनि आला मारितसे त्या लाथेनें ॥
वृत्त पोचतां शिबिरा पांडव धांवत येती घाईनें
कृष्णार्जूना वदे वीर मज दुःख न होई मृत्यूनें ॥
जयद्रथानें लाथ मारिली क्लेश बहूमज हे होती॥३व्यूह॥अक॥

## अंगद शिष्टाई गाणें ५ वें.

चाल—सदसद्विचार करूनी हृदयीं खुशाल संसारकरा

हनुमानानें वीर निवडला अंगद शिष्टाइला
रघुविरा योग्य भला वाटला ॥ अ. क. ॥
राम शिकविती गोष्ट अंगदा कळवाया रावणा
भोगिशिल कठिण बहू शासना ॥
चोरी केलिस तशांत स्त्रीची निंद्य तुला ब्राह्मणा
येइ बा सज्ज आतां तूं रणा ॥
मात ऐकुनी वालिसुतानें केलें उड्डाणा
क्रमियलें वायुपरी गगना ॥

चाल–मध्य दरबारांतचि उतरूनि ठाके धिरें
त्या प्रहरीं ती बहु असुरसभा बावरे
कुणि ह्मणती मारिल आला हनुमंत रे ॥
चाल प.–कोणि पुसेना कशास आलां बोलुनि त्या कपिला
दशानन बहुत मनीं खचला ॥ १ ॥ अ. क. ॥
वालिसूत तो वदे तयांला काय असे भ्याला
पुसानां स्वागतासि मजला ॥
दशाननानें उत्तर केलें अमार्गगामी आलां
ह्मणुनि मज क्रोध बहु चढला ॥
हसे वाळिसुत वदे रावणा पाहीं अपुल्याला
दुर्गुणें देह तुझा भरला ॥
चाल–काय भ्याडा परि तूं केलें तस्कर पण
तरि तशांत वाइट अति हें स्त्री धन हरण
हें कुठें शिकुनिया जडवितोसी तू अवगुण
चाल पहिली–थोर होउनि देई सितेला परतचि रामाला
कशाला प्राण देशि आपुला ॥ २ ॥ अक ॥
त्वेष पाहुनी वालि सुताचा रावण घाबरला
म्हणे हा खचित काळ आला ॥
पुसे परी हळु कोण कुठिल तूं सांगरें मजला
देइ मग अंगद जाबाला ॥
वालिसूतमी रामदूतही ओळखिरे मजला
शरण ये लवकरि रामाला ॥
चाल–हें कायकरिशी तूवालि कपी नंदना
तवतात ठकवुनी राम करी वहना
तवमाता थोरहि देई बंधूजना
चाल प.–काय तोंड हें दाखविशी मज देई सागरिं जीवाला
अलातूं कशासि शिष्टाईला ॥ ३ ॥ अक ॥

हर हर देवा संकट कैचें राजा वरआलें ॥
धाय मोकलुनि जन तें रडती कठिण तया गमलें॥ ५॥ अक॥
घोर वनामधिं त्रिवर्ग येतां ऋषिनें आज्ञापिला ॥
सूर्य तापुनी ऋषिइच्छेनें ताप कठिण पडला ॥
तृषा भाजि मग रोहिदास गुणि लहाना बाळाला ॥
दृपत्या उचलुनि करें आपुल्या मार्गी पुढें चालला ॥
द्विज रूपानें ऋषी भेटुनी घे पदत्राणाला ॥
अनवाणी मग तिघे चालती सुज ये पायांला ॥ ६ ॥ अक॥
बाळ काळजि करी पित्यासी फेडूं ऋण केवीं ॥
प्रळय होइ जरि नरकीं पडुं हो म्हणुनि भाव दावी ॥
कपटा करुनी ऋषी पुढें तो पाणपोइ बनवी॥
रायसती सुत दमली म्हणुनी त्यांना बोलावी ॥
फुटा फूटही झाली परि न च हस्त एक लावी ॥
पाहुनि ऐसें ऋषि वणव्याला क्रोधें उपजवी॥ ७ ॥ अक ॥
तारामतिसी दावी ऐसें पतिसुत ते जळले
सती जावया पंचप्राण मग तिघे सिद्ध झाले॥
ऋषिनें भिउनी तपनाशासी माये आवरिलें ॥
पतिसुत सत्वरि सजीव सतिच्या दृष्टी मग पडले॥
त्रिवर्ग मग ती पुढें चालली काशीपुर लागलें ॥
शिव सांभातें नमुनी फिरतां तेथमुनी पातले॥ ८ ॥ अक ॥
मुनि त्यां वदला उदकहि सोडुनि मजला ठकवीलें ॥
देई दक्षणा नकार अथवा कांपत तावविलें ॥
अस्ताचलिं नच दिन जाई तंव देइन विनवीलें ॥
त्रिवर्ग अपणा विकण्यासाठीं बाजारीं चालले ॥
मातापुत्रां दीड तुकाला ऋषिनें वोपीलें ॥
नृपा दोन तुक सुवर्ण घेउनि डोंबाला दिधलें ॥ ९ ॥ अक ॥
डोंब बोलला नृपा अळशा राख मसणवटि ती ॥

सर्पदंशमृत रोहिदासुसरि ये तैं तारामती ॥
ओळख पडुनी पुत्रमृत्युचा शोक बहू करिती ॥
नृपस्नानासी जातां ऋषिसति, लाव तिला वनविती ॥
राजाज्ञेनें नृप मारी तिज मुनी हात धरिती ॥
धन्य धन्य तुझि सत्व धीर हो अद्भुत या जगातिं॥ १०॥अक

## आईचा मुलीस उपदेश गाणें ७ वें.

चाल–सदसद्विचार कळनी त्हृदयीं खुशाल ॥

लीनपणानें सासरिं वागुनि प्रीती जडवी मुली
वंद्य हो उभय कुळांना भली ॥ अक ॥
सासुसासरे जसे सांगती चालत जा सासरीं ॥
पतीची आज्ञा मोड न परी ॥
जावानणंदा कांहिं बोलल्या ऐकुन घे अंतरीं ॥
उलट तूं बोलुं नको जरि खरी ॥
दीर लहानगे तुला मारिती सोशित जा क्षणभरीं
अर्जवें घेइ त्या कमरेवरी ॥
चाल–मग नांदशील सुखरूप तिथें तूं वरी ।
तुज वागवितिल गे सर्वहि कन्येपरी ॥
तूं ध्यानीं ठेवि अपुल्या गोष्ठ ही खरी ।
चाल प०–असें ऐकशी सुख घेशी तूं देशी या माउली ॥
वियोगें बहुत मनीं कष्टली ॥ १ ॥ अ.क. ॥
अपराधी तू असशी कर नव असत्य भाषण कधीं ॥
दंडिती तूज जरि चौघामधीं ॥
भूक लागल्या चोरुन खाऊं नये बाइगे सुधी ॥
जेविती तुज जरि टाकुनि अधीं ॥
पडल्या कामा हातिं धराया लाजुं नये आवधी ॥
अळसाचि न करी कामामधीं ॥

[library stamp]

आणखी वदला वालिसुतातें विचार करि त्वा मनीं
राहि ज शहरणांगत होउनि ॥
अंगद बोले तुला मारिलें मी होतें तैं लाथांनीं
बद्ध जैं होतासी पाळणीं ॥
वण दिसती ते तोंडा वरती पाहि आपुल्याझणीं
तुला कां शरण येइ तव धनी ॥
चाल—तूं फार नको कीं बोलुंच दशानना
मज वाटे निश्चित करिशी मूढपणा
तूं येई सत्वरीं शरण रामचरणा
चाल पहिली—सीता देउनि प्राणवाचविं ऐके बोधाला
योग्यमज दिसतें हें तुजला ॥ ४ ॥ अक ॥
अगंद वदला मीच एकटा घेइन तव प्राण
पाहिही बांधिव आंगवण ॥
रावण क्रोधें सभेंत वदला मंत्रिजनालागुन
कराहो तुह्मिच अतां खंडण ॥
राक्षस कवटाळितां तयाला गगनांतरिं उडला
अंगदें असुर नाश केला ॥
चाल—मग खालीं येउनि दडपी रावण तळीं
तो किरिट घेउनी चढला दिग्मंडळीं
श्रीराम प्रभूच्या वाही पद कमळीं
धन्य मानितो राम अगंदा विजयी जो जहाला
प्रभूच्या अंशगुणें सजला ॥ ५ ॥ अक ॥

## हरिश्चंद्र गाणें. ६ वें

नारद प्रकटे इंद्रपुरीसी सभा मंडपाप्रती ॥
हरिश्चंद्रनृपसत्वगुणाला वर्णी बहुता रिती ॥
परोपकारी सत्यवादि तो सत्वगुणमूर्ति ॥

उपमानाहीं साधुपणा त्या कोठें याजगतीं ॥
विश्वामित्रा मत्सर येउनी बोल न ते रुचती ॥
क्रोधें वदला वशिष्ठमुनिसी नृप गुण नच टिकती ॥ १ ॥
हरिश्चंद्र नृप सत्व परिक्षा विश्वमुनी करिती ॥
नृपतारामति रोहिदासही किंचित नच ढळती ॥ अक ॥
वशिष्ठवदला सत्व टाकितो जैं माझे पूर्वज ॥
रौरवकुंडाभितरी यवनही वेद म्हणें सहज ॥
होइ असें जरि सुरा पान बहु दोषहि लागो मज ॥
विश्वामित्रहि करी प्रतिज्ञा ऐकुनि मुनिचें वच ॥
नानायत्नें हरविन सत्वा वाचा ही साच ॥
नातरि देइन साठ कोटि तपसुकृत त्यासीच ॥२ ॥अक॥
मायें मुनिनें क्रूर श्वापदें निर्मियलीं काननीं ॥
धेनुपाथिकां त्रास देति तीं टाकितीं भक्षूनी ॥
त्रस्त प्रजा ती मात घालिती झणीं राजकर्णी ॥
हरिश्चंद्र नृप वधावया त्यां जाई घोर रणीं ॥
विश्वामित्रें कपटें आपुल्या दिव्य मठी करुनी ॥
तारामतिसह राव गोंविला आश्रमिं त्या आणुनी ॥३॥अक॥
मृगयातापें राजा थकला घेई निद्रेसी ॥
स्वप्नीं विश्वामित्रा केलें दानहि राज्यासी ॥
जागृत होतां ऋषी पातला दानदक्षणेती ॥
हरिश्चंद्र तो उदक घालिता झाला हस्तासी.
कनक दक्षणा देण्या येती मागें नगरासी ॥
ऋषीतापळा कनकचि माझें कैंचें मज देशी ॥४॥अक॥
मुनी म्हणे त्या राज्य आपुलें अन्नें गज दिधलें ॥
देईं दक्षणा राज्या विरहित जें कांहीं राहिलें ॥
रायम्हणेत्या काशित जाऊन पुरविन जें दिधलें ॥
सुतपत्नीसह काशीवासा नगर तयें सोडिलें ॥

चाल—तू होशिल गुणवानांमधिं सरी ॥
संसारहि करशिल सासूपरी ॥
सुखदेतिल सकलहि तुज सासरीं ॥

चाल प०—बोधाचे हे बोल मानुनी कर अपणा साउली ॥
होइगे आयकती चांगली ॥ २ ॥ अ.क. ॥
पतिसेवेमधिं तत्पर व्हावें दोघानां तें बरें ॥
साध्विनां वंद्य असें हें खरें ॥
पति आज्ञेसी लीन सदा हो कारि नच मन बावरें
समज हित निश्चित त्याचे करें ॥
एक विचारें तुम्हीं चालल्या दुःख खचित गे सरे ॥
ह्या गुणें द्रव्यहीन सावरे ॥

चाल—किति सांगु पुरे वाटतो बोध हा ॥
तूं मनन करीं चांगलें हें पहा ॥
मग म्हणशिल गे चांगला किति अहा ॥

चाल प०—पतिव्रता तुज जनें मानुनी जगती वंदीली ॥
ऐकुंदे गोष्टीही चांगली ॥ ३ ॥ अक ॥

## पुणेंशहर गाणें ८ वें.

चाल—लंकापुरी, पुरी राज्य नगरी.

बाईगे शहर शहर पुणें थोर
सभ्य चालिचें आगर ॥ बाइगे ॥ अक ॥
पेशवाई ती, शाहुनें स्थापियेली ॥
शूर बाजीनें गाजवीली, पुणें शहरिं बाई ॥
शूरत्व दाखवोनी शत्रु पराजित तेकरुनी ॥ १ ॥ बाइगे ॥
पुणें शहरिं पेठा, पेठा अत्राढ्य ॥
मोठ मोठीं घरें *दिव्य*, वसति ज्यामध्यें ॥

ज्यामध्यें धनिक लोक, गुंग कितीतरी कामांत॥ २॥ बाइगे शहर
शनुवारचा वाडा, वाडा पेशव्यांचा
विलक्षण बांधणीचा, बांधले बुरुज
सभोंवार त्याचे, मोठमोठे ही दरवाजे ॥ ३॥ बाइगे शहर
हौद नानांचा स्तुत्य पुण्यग्रामीं, सदाशिव
पेठे देखिला मी, औषधी पाणी; स्वच्छ किती
त्याचें, पोषण करि तें जीवांचें ॥ ४ ॥ बाईगे शहर
तुळशी बाग रम्य, रम्य पाहुं जातां,
राम लक्ष्मणसह सीता, दिसति हो आंत,
दिव्य देऊळांत, काय वदूं तें साद्यंत ॥५॥ बाईगे शह. ॥

## पृथ्वीचा आलाप गाणें ९ वें.

चाल--सदसद्विचार करुनी हृदयीं खुशाल संसार करा वाटतो
भार वहाते ईशाज्ञेनें या जगताचा परी
जाहली भ्रष्ट प्रजा हो खरी ॥ अकण कडवें ॥
धर्म बुडाला न्याय सूटला जिकडे तिकडे हरी
जाउं मी शरण कुणाला तरी॥
ब्रह्मदेव उत्पत्ति करी श्रीविष्णू राखी स्थिती
शिवानें प्रळय घेतला हतीं ॥
निर्दय कैसे हृदयिं जहाले विसरुनि गेले मला
पातकी लोक असा जाहला ॥
पातकभारा धरवे नच मज कुंठित झाली मती
दयाळा पाहिं दयेनें स्थिती
सासु सासरे जावानणंदा पक्षपाति होती
सुना त्या परवाही सोडिती ॥
भर्ते पत्नीवरतीं क्रोधा घडोघडीं धरिती
स्त्रियांचा मान कधिं न राखिती ॥

नारी उर्मट होउनि पतिच्या उपमर्दा करिती
पतीच्या वचनातें मोडिती ॥
कुठें कळेना गेली नीती बुद्धी सर्वांची
गाय मी विनवुं कुणा साची ॥
परधन अबला अभिलाषाची कुबुद्धी जन धरिती
सत्य तें कोणि कधिं न पाळिती ॥
शासन करि तूं देवा जन जे नीतिविणें चालती
पुण्य तूं वाढवि मजवरती ॥ अक ॥

## श्रियाळ गाणें १० वें.

चाल—एक चतुरर नार पेरा.

विणा घेउनी नारदमुनि तो शिवराजपाशीं पातला ॥
ह्मणे तयाला भक्त बहुत परि श्रियाळ तो पहिला ॥
सात्विक उदार सुशीळ केवळ क्षमावंत बनला ॥
इच्छाभोजन कांतीनगरीं अतितां देई भला ॥
इच्छित वस्तु दुर्भिळ परिही प्रयत्न करि चांगला ॥
तोषवि अतितां मिळवुनि देवुनि भावें सकळांला ॥
ऐसें ऐकुनि पंचवदन तें अतीत रुप धरिती ॥ १ ॥
श्रियाळराजगृहिं शिव येउनि सत्व थोर पहाती ॥ अ. क. ॥
वदति श्रियाळा कोपें पाहुनी दुष्ट वचन जागा ॥
इच्छाभोजन दे ना तरि मी सत्व तुझें हरिन ॥
श्रियाळ राणा दोहि चांगुणा लागति पायांना ॥
आसनिं बसवुनि पूजा करुनी विनविति त्या यतिना ॥
मागा स्वामी इच्छाभोजन इष्ट असे आपणां ॥
स्वामि ह्मणे नरमांस मला तुह्मि द्यावें आणून ॥
रहेर तूं आणुनि देशी मज नच आवडती ॥२॥ श्रि. अ. क,

विकृत आगुनी मनुष्य देशी मज नच अवडे तसें ॥
वदे चांगुणा मांस स्वतांचें आपणा मी देतसें ॥
श्रियाळ विनवी माझें घ्यावें मांस मुनी तैसें ॥
यती ह्मणे तो पवित्र तुमचें मांस उचित मज नसे ॥
तुह्मां भक्षितां अन्नसत्र हें सरेलहो सरसें ॥
एकुलत्या तव बाळाचें मज मांस देई गोडसें ॥
असें ऐकुनी मायाजाळा अवरुनी हो ह्मणती॥३॥श्रि.अ.क.॥
वदे सदाशिव बृक कीं व्याघ्रचि नाहीं मी परिसा ॥
ह्मणुनि शिजवुनी घाला मजला पुत्राच्या मांसा ॥
मोह धरुन जर रडाल तरि मी जाइन सत्वरसा ॥
सत्य घेउनी थोर तूमचें क्षुधित बहु ऐसा ॥
अवश्य म्हणुनी पुत्रा वदती येईरे राजसा ॥
यती उभे बा तुझ्यासाठीं कीं येइ ह्मणोनिसरसा ॥
इच्छाभोजन तव मांसाचें इच्छिति त्या म्हणती॥४॥श्रि.अ.क
धांवत येउनि आइबापांचे पुत्र धरी चरण ॥
अतिथापुढतीं जाउनि त्याला बाळ करी नमन ॥
माते वदला इष्ट अतीता मम मांसदान ॥
तरि मी अपुला देहचि केला आजि शिवार्पण ॥
उमारमण कीं बहु संतोषे तृप्त अतिथ पूर्ण ॥
वाणि परिसतां प्रिय बाळाची माता घे चुंबन ॥
कडिये घेउनि बाळ चालली पाकगृहीं ती सती॥५॥श्रि.अ.क
मायापाशें सती चांगुणा पुत्रा ह्रदयीं धरी ॥
बाळ ह्मणे तैं माते येइन खास तुझ्या उदरीं ॥
वध तूं मजला अतिताकारण लोभ मनीं न धरीं ॥
सत्वरक्षणा कारि वज्राहून दृढ मन ती धाजरी ॥
चिळया कापुनि शीर ठेउनी शिजवी मांस करी ॥
उठवि भोजना अतिता परि तो समजे तें अंतरीं ॥

म्हणे सतीला वगळिशि तूं शिर न मान्य मज ती कृती॥६॥श्रि
उठुनि चालिला तात्कालिक मग क्रूरतसा अतिती ॥
शीर प्रधानचि शरिरीं असतां मजला फसवीती ॥
राय चांगुणा शिरही दतां म्हणाति तयावरती ॥
सत्व रक्षुनी भोजन घ्यावें म्हणुनी विनवीती ॥
परत येउनी शीर आज तें सांगे थोर यती ॥
उखळीं कांडण समस्त करीं तूं अश्रुविणें पुढतीं ॥
मान्य वचन तें करी चांगुणा कांडि शीर हातीं ॥७॥ श्रि. अ. क.
देह त्यागिन म्हण चांगुणा अतीत गेल्यावरी ॥
भोजन करुनी तृप्त होउनी धीर मनीं न धरीं ॥
उठा म्हणे मग शिवरुपि यतितें भोजन घ्यावें परी ॥
अतित श्रियाळा बोलावी त्या पंक्तिस अवसरीं ॥
वदे पतिस ती सती वाहिला मास नऊ उदरीं ॥
जडहि नव्हे तो बाळ गोजिरा तुम्हां चार प्रहरीं ॥
श्रियाळ येतां सतिसि वाहे भोजन करण्या यती॥८॥अ,॥श्रि
दोघें पंक्तिसि येतांची यती तेथुनियां उठला ॥
निपुत्रिकाचें अन्न न घ्यावें दोष फार वदला ॥
गहिंवर दाटुनी रायराणि ती म्हणती त्या यतिला॥
एकुलता तो एक पुत्रही तुम्हांसि अर्पीला ॥
शोक करितसे बहू चांगुणा वधिलें बाळाला ॥
परी अंतिं तो सत्व घेउनी यतिही चालीला ॥
प्रेम पाहुनी सत्वावरि तें यति सद्गद होती ॥९॥ अ. क. श्रि.
प्रसन्न होउनि म्हणे तयांला धन्य तुम्हीं जगतीं ॥
इच्छित वरास मागुनि घ्यावें देतों तुम्हांप्रती ॥
पुत्र परत हो द्यावा मजला प्रार्थितसे ती सती ॥
तुष्ट होउनी पंचवदन ते तिजला तैं बोलती ॥
बोलावी तूं पुत्र तुझा तो येइल कीं मागुती ॥

चिलया बाळा हांकु फोडितां धांवत आला प्रती ॥
शिवरुप यतिनें प्रकटचि करितां पायांवर लोळती ॥ १० ॥
श्रियाळ राजग्राहिं शिव येउनि सत्व थोर पहाती ॥ अ.क. ॥

## गाणें ११ वें.

चाल—पडला अभिमन्यु

विनवि गुरु कन्या देवयानि कच तो ॥
पाणिग्रहण करि न परि तो ॥ अ. क. ॥

वैशंपायना जन्मेजय पुसती ॥ सविस्तर सांगा गोष्टी ती ॥
मनरंजक, संजीवनि प्राप्ती ॥ देवां झाली कच मदती ॥
शुक्रापासूनी, देवयानि योगें ॥ झालि न असती बहु यागें॥
देव उठवाया, मंत्र मिळवि अंगें ॥ गुरुसुत सेवुनि शुक्रागे॥
१ ॥ विनवि ॥ अ. क. ॥

असुर जे मरती, शुक्र ऊठवीतो ॥ संजीवनि मंत्र चालवीतो॥
देव पाहूनी, मनिंहो बावरती ॥ गुरुसुत कचा पाठवीती ॥
मंत्र साधण्याला, युक्ति शीकवीती ॥ साधन होई ज्या रीती॥
जाउनि कच तेथें, गुरुसेवा करिती ॥ शिष्यारूपें घरिं राहती ॥ २ ॥ अ. क. ॥ विनवि०

असुर पाहूनी, कच हा गुरुसदनीं ॥ संशय घेती थोर मनीं॥
साधिल हा मंत्र, गुरुला फसवूनी ॥ म्हणुनि मारिती त्या रानीं॥
मांसाचे तुकडे, मृगांस देवोनी ॥ कच न पाहतां देवयानी॥
शोक करी बहुत, बापा लागोनी ॥ विनवी आणा कचा झणीं ॥ ३ ॥ अ. क. ॥ विनवि० ॥

मंत्रजप करुनी, गुरुनें बाहीला॥ वृकोदर भेदुनी कच आला
हर्षली कन्या, परि तो पाठविला ॥ फुलें अणाया रानाला ॥
तेव्हांही असुरें; चरचर कापीला ॥ जलधी माजी टाकीला ॥
४ ॥ अ. क. ॥ विनवि०

मुलिचें एकोनीं, पुनरपि उठवीला ॥ परि असुरें तो दग्ध केला राख पाजियली, सुरेंत मग गुरुला ॥ देवयानेजिव घाबरला पाहिन कच कोठें, बापचि विनवीला ॥ गुरुनें देखियलें त्याला अंतरिं, मग पोटीं क्रोधें खवळला ॥ धिक्कारिलें राक्षसांला ॥ ५ ॥ अ. क. ॥ विनवि० ॥

शुक्र हाक मारी पोटीं शिष्याला ॥ आंतुनि दे कच हाकेला ॥ मंत्रउपदेशा, करुनी शिकवीला ॥ भेदुनि येई उदराला ॥ कच येऊनी, गुरु मग उठवीला ॥ कचा तो मंत्र साध्य झाला ॥ कच सेवेनें गुरु तो संतोषिला ॥ गृहिं जावया सिद्ध ठेला ॥ ६ ॥ अ. क. ॥ विनवि

देवयानि विनवी, अंगीकारोनी ॥ जा मज कुलिना घेवोनी ॥ कच समजावी, होशि माझि भगिनी ॥ अलों गुरूच्या उदरांतुनी आणि जी विद्या, नेशी साधूनी ॥ कामिं नये तुज लागोनी ॥ कचही तिज वदला, शिष्या शिकवूनी ॥ फळा ये ती त्यापासूनी ॥ परि तुज न वरी कीं ऋषिसुत गे कोणी ॥ पाप भोगशिल खरि वाणी ॥ ७ ॥ अ. क. ॥ विनवि० ॥

## ध्रुवाख्यान गाणें १२ वें.

चाल—जागारे जागल्यानो० या चा०

एकाहो ध्रुवाख्याना पुण्यराशि कां कराना ॥
भक्तचरित ऐकोनीया गेला ध्रुव अढळस्थाना ॥ ध्रु ॥
उत्तानपादराया होत्या दोन हो जाया ॥
थोरली नावडती परी तिजसी पुत्रप्राप्ती ॥
नावडे धाकटीला पुत्र न भेटवी राया ॥ १ ॥ एकाहो ॥
पांच वरुषें पुत्रा होतां पुसे मातेसी ताता ॥
दाखवी मला वेगीं भेटि न होई तुजलागीं ॥
समजावी त्यासी माता परी भेटे सुदिन येतां ॥ २ ॥ एकाहो

राया देखुनि संतोषला पुत्रा अंकीं बैसवीला ॥
साहेना आवडतीसी लोटी तेथूनि भुमीसी ॥
बाळक रडुं लागला मातेपाशीं तें बोलला ॥ ३ ॥ एकाहो
माता ह्मणे देवा नाहीं पूजीयेलें आपण कांहीं ॥
ह्मणूनी राजा त्यागी ऐकूनी हें मातें लागीं ॥
ऐसे कोठें देव वसेही सांगे मजला त्वरीतहि ॥ ४ ॥ ऐ.
ती बोले देव भरला सर्व जगीं तोची ठेला
त्यासी योगी धुंडीताती परी त्याला न भेटती ॥
बा काय सांगू तुजला भेटी होइना कोणाला ॥ ५ ॥ ऐ.
ऐकोनिया रडूं लागे चालू लागला वेगें ॥
देव भेटी व्हावयासी माता लागली पाठीसी ॥
मात तें राया सांगे तोही जाई मोहसंगें ॥ ६ ॥ ऐ.
राजा विनवी राज्य देतों ध्रुव वदे आतां जातों ॥
परमेशा भेटायाला काय करूं मी राज्याला ॥
जिवा ताप थोर होतो आतां निरोपा घेतों ॥ ७ ॥ ऐ.
ह्मणोनी देवा वाही भेटी मजला देई ॥
नारद त्या भेटला मंत्र तेणें उपदेशीला ॥
मग जप करी देहीं ह्रद्यीं नारायण पाहीं ॥ ८ ॥ ऐ.
दिव्य रूप देखियेलें नमस्कारें पुजीयेलें ॥
पुसे इच्छा देव त्यासी द्यावें अढळपदासी ॥
दया त्यानें विनवीलें देवें प्रेमें तें दिधलें ॥ ९ ॥ ऐ.

## संसार गाणें १३ वें.

चाल—श्रीरंगकोपिकोत्संग याचा.

संसार थोर बाजार कठिण तो फार वाटतो बाई ॥ चा. चा.
मी शरण कुणाला जाऊं सुचेना कांहीं
हा किती सकळ जाणती देई वीपत्ती ( देई वीपत्ती )

गर्वे हो हरलनी मग फिरली कितिकां सन्मार्गा पासूनी ॥
घडि घडि काळजी धरिली कुडीही झिजली
मग शरिर शक्तिली सोडुनि मज कीं गेली ॥
किति तरी बुद्धि भ्रमली भ्रांति ही भरली गोडि संसारीं
परि समज सुखे इहलोकीं रहातीं सारी ॥ चाल ॥
या कलिनें किति ग्रासिलें हो पहा
मन भुलवुनि किति छळती ते सहा ॥
मतिमंद जाहला सगळा लोक हा ॥
म्हणुनिया नको संसार करी वीचार मानसा कांहीं ॥
सुखि होशिल तरि आश्रयीत प्रभुपायीं ॥ संसार ॥ अ.क.॥
पैठणी नेसण्या सगे [illegible] भरजरी प्राप्त हो मजला
परि तृप्ति न वाटे [illegible] अधिक कीं सुटला ॥
कांचनें देह मंडि [illegible] जाहला [illegible]ही गेला
परि मानस इच्छि [illegible] जडलेला ॥
मिष्टान्न नित्य किति तरी मधुर मधुर परी मिळत जिव्हेला
परी वीट येउनि गोडि न वाटे मजला ॥ चाल ॥
होइ कशीहि नकळे मानस स्थिति ॥
संसार सुखें तीं सत्य न मज वाटतीं ॥
कीं इष्ट मानिली लीला हो उपरती ॥
[illegible] क्षणीं पुसुनिया मनीं सत्य निवडुनी धीर तो जाई ॥
[illegible] मुखें वदाया तृप्ति न उरलि काहूं गत काई ॥ संसार ॥ अ.क.॥

पतिव्रतेचा धर्म-गाणें १३ वें.

पतिव्रतेचा खरा धर्म हा ऐका भरतीनें ॥
पाळुनि तो या भवचक्रांतुनि निसटा युक्तीनें ॥
पुण्य बहू परि अल्प पातका जन्मांतरिं केलें ॥
मनुष्य देहीं स्त्रीजातीमधिं विधिनें घातीलें ॥
तथापि त्यानें ज्ञानामृत हें देउनि पाठविलें ॥

या दोन्हीं जे पशुपक्ष्यांना नाहीं हो दिधले॥
या ज्ञानाचा सद्व्यय करुनी थोरपणा मिळवा॥
स्वजातिची ही ओळख ठेउनि अज्ञाना पळवा॥
परमेशाची इच्छा ऐशी जाणा हो बाई॥
सद्धर्मानें काळ घालवा मोक्ष दूर नाहीं॥॥१॥ अ. क.
सुशिल स्त्रिया ज्या संसारामधिं लक्ष्मीच्या मूर्ति॥
सुखोपभोगा घेउनि अंतीं करिती सत्कीर्ति॥
स्त्रियावीण जीं घरें अढळती उदासीन दिसती॥
संतति संपति सिद्धी मिळण्या कारणत्या असती॥
स्त्रीविण पुरुषा खरें सूख तें संसारीं नाहीं॥
जरि अनुकुलता सकल लाभली तरी फुकट जाई॥
संसाराची गाडी न चले जरी नाण स्त्रीची॥
थोरवि ऐशी स्त्री जातीची सांगु किती पारखी॥
परमेशाची०—॥ २ ॥ अ. क० ॥
सुखदुःखाचे नियमित वांटे लिहिले जे भाळीं॥
यथान्याय ते मिळती सर्वां फिरती न कधिं काळीं॥
तत्व ठेउनि ध्यानामधिं हें सदाचरण जोडा॥
भ्रतारसंगें आल्या जन्मीं शोभवुनी जोडा॥
पति जो वरिला त्याशीं अपुल्या पापपुण्य ठेवा॥
पतिची आज्ञा पालन करणें सद्गुण मानीं ठेवा॥
पतिवरि निष्ठा पूर्ण ठेउनी वागा संसारीं॥
मिळतिल अपणा निश्चय जाणा बरविं सुखें सारीं॥
परमेशाची०—अकाण कडवें । ३ ।
स्वगृह सोडुनि परगृहासी सत्कारणवीण
जाई नच जी धन्य जरी ती वर्णानें हीन
पर पुरुषाशीं बोल न करणें हाचि जिचा नियम
ताणि तिनींहो सिद्ध असी कीं कांपति हाति यम॥

अग्नि स्पर्शाहि करण्या जैशी मना वाटते भिती
परनर सावुलिही घ्यायाला पूर्ण धरी खंती
ऐशा पवित्र स्त्रीची सेवा सर्व सिद्ध करीती
इहपरलोकीं नरगंधर्व सुरही स्तुति करिती
परमेशाची. ॥ अकण कडवें ॥ ४ ॥
प्रेमळ वाणी मधुर बोलणीं करुनी पति रमवी
श्रम परिहारा सेवा करुनि आनंदें सुखवी
प्राप्त वस्तु ती मानुनि बरवी उपयोगा लावी
समाधान बहु राखुनि मानसिं संतोषा दावी
गृहकृत्यांमधिं दक्ष राहुनी पतिसि धीर देई
संकटिं पडल्या पती कशाहि जरी दुःख होई
ऐश्वर्यामधिं दीनावरि जी उपकारा करिते
ऐशा साध्वी स्त्रीची हानी कधींहि नच होते
परमेशाची. ॥ अकण कडवें ॥ ५ ॥
महत्व जाणा या गाण्याचें थोर बहू बाई
गाण्यापुरतें नाहीं केलें खचित वदूं काई
स्त्रीपुरुषांनीं मनन करूनी सद्वर्तनें व्हावें
स्त्रीनें पतिसी पतिनें स्त्रीशीं तेणें सुख द्यावें
स्त्रीविण पतिची पतिविण स्त्रीची कठिण दशा कैशी
होते याचा विचार पूर्णचि करा किहो मानशीं
स्वप्निंहि सुद्धां नको दुःख तें येउ देउं देवा
मान्य मला हो वचन जणूं हा रत्नांचा ठेवा
॥ ६ ॥ परमेशाची इच्छा ऐशी.–अकण कडवें

गाणें १५वें एका स्त्रीचा आपल्या मैत्रिणीस उपदेश.

( चाल—गोपाळ गड्यांचा मेळ, हरी संगें खेळ, कुंजवनिं रमली ॥ १ ॥ नको वाजवुं श्रीहरी मुरली.

किति सांगुं पतीची थोरी, जगतिं कैवारि, एकटा तारिगे ॥ १ ॥ सखे होइ पतीला प्रियगे ॥ त्यावीण कांहिं तुज नलगे "कांहिं तुज नलगे" ॥ अ. क. ॥ बाकिचीं तडिचिं पोहणार, फुकट हसणार, संकटीं तुजगे ॥ ॥ २ ॥ सखे होइ० ॥ अ. क. ॥ नको दुखवूं पतिच्या मना, न करि वल्गना, राग जैं येगे ॥ ३ ॥ सखे होइ० ॥ अ. क. ॥ संसारिं मदत तूं करी, चतुरता धरी, ओळखुनि पतिगे ॥ ४ ॥ सखे होइ० ॥ अ. क. ॥ मनोभावें करी तत्सेवा, जोडि तो ठेवा, कामा यईगे ॥ ५ ॥ सखे होइ० ॥ अ. क. ॥ नको दागिन्यांचे धरूं हाव, स्त्रियांचि ति धाव, धाव पतिला गे ॥ ६ ॥ सखे होइ० ॥ अ. क. ॥ ॥ रात्रिशीं पतिस संतोषि, सुखा अनुभविशि खचित जाईगे ॥ ७ ॥ सखे होइ ॥ अ. क. ॥ सौभाग्य तुझें [illegible], जो त्या भारि, विसंबु नकोगे ॥ ८ ॥ सखे होइ ॥ अ. क. ॥

नवऱ्याचें नांव घेण्याचे उखाणे.

१ तुळशीवरच्या रामाचें रत्नांचें रेण.......[illegible] किंमत माझी मीच जाणें.

२. चांदीच्या तबकांत सोन्याचे चौफुले........ कुळांत...... शोभले

३. साटिणीची चोळी तिला जरीचे कांठ, देवाची कृपा म्हणून........ची गांठ.

४. समोराला कोनाडा त्यांत हस्तिदंती फणी........ चें नांव माझे ध्यानीं मनीं.

५. सोन्याची सगई दिवाणखान्यांत ठेवली.......ची मूर्ति मनामध्यें भरली.

६. डोकींतला नाग त्याला जडावाची नकशी....... आले जाऊंच्या काशी.

७. बेलानें पान शिवाला वाहिलें.......च्या साठीं शहर पाहिलें.

८. केशराची उटी प्रेमानें लावली.......ची शेज आवडीनें केली.

९. चांदीच्या गडव्यावर सोन्याचे पेले येवढ्या मोठ्या समारंभांत.......शोभले.

१०. सोळा पानांचा [illegible] रामटेकी पान....... च्या नांवावर... [illegible] न.

११. आकाशीं चंद्र [illegible] तारा सासूबाईंच्या पोटीं...... हिरा.

१२. माहेरपणानें सुख कितीतरी भेटलें.......च्या मायेनें सासर अधिक वाटलें.

१३. वाल्मिकी रामायणात सीताबाई गाजे.......ना बायको.......साजे.

१४. चांदीच्या ताटांत नवलपरीचे लाडू.......नांवा-साठीं नका धीर सोडूं.

१५. गंगेच्या पाण्याला ह्मणती गंगाजळ.......चें मन त्याहून निर्मळ.

१६. मोत्यांची नथ तिला सोन्याचे फासे इंग्रजांच्या दरबारांत.......खासे.

१७. कोल्हापुरची देवी नवसाला पावली.......च्या दुधाची जन्मभर सावली.

स.म.स.